भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2017 ◑ RV 029709

TREASURY OFFICE NASIK

SEP 2017

STPHC

# संमती पत्र

संमतीपत्र आज दिनांक २६ माहे संप्टेबर सन २०१७ दिवशी नाशिक मुक्कामी.

**लिहून घेणार पक्ष नंबर.१**

मे. अमर बिल्डटेक प्रा लि., इंडियन कंपनीज ॲक्ट अन्वये नोंदविलेली कंपनी.. नोंदणीकृत कार्यालय- रा. १२, शांतीनिकेतन अपा, नविन पंडीत कॉलनी, शरणपुर रोड, नाशिक तर्फे डायरेक्टर

श्री.सुजित रामकृष्ण जाजु
वय- ४१, धंदा- व्यापार,
पॅन नं. AARPJ 8901 A
यांसी

**लिहून देणार पक्ष नंबर.२**

१.श्री. कमलेश ~~बसंत~~ यशवंत कोल्हे वय-२९ धंदा -नोकरी

सौ. प्रियंका कमलेश कोल्हे वय- २७ धंदा -घरकाम

रा. १६, मनोमय अपार्टमेंट खांडे मळा, सावता नगर, सिडको, नाशिक.

२ श्री. प्रणय अरूण गुजराथी वय-३३ धंदा -नोकरी

सौ. हेमांगी प्रणय गुजराथी वय-३०, धंदा -घरकाम

रा. बंग्लो नं.२३, सहजिवन कॉलनी, दत्तमंदीराजवळ, विरोमळा, कॉलेजरोड, नाशिक.४२२००५

३ श्री. कचरू महादेव काकड वय-४९ धंदा -नोकरी

सौ. माधवी कचरू काकड वय-४५, धंदा -घरकाम

रा. एन ४१ जे ऐ २/१/७, महालक्ष्मी चौक, गणराज मेडीकल समोर, सावता नगर, नाशिक.

४ श्री. महेश खुशल राणे वय- २८ धंदा -नोकरी

सौ. शोभा खुशल राणे धंदा -घरकाम

रा.सदनिका नं.१, ज्ञानाई अपा, अभियंता नगर, कामटवाडे, नाशिक. ४२२००९

कारणे संमती पत्र लिहून देतात की,

**जोडपत्र -२**

दस्ताचा प्रकार/ अनुच्छेद क्रमांक :- संमतिपत्र

दस्त नोंदणी करणार आहे का? :

असल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचे नांव :

मिळकतीचे वर्णन :

मोबदला रक्कम :

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता :- मे. अजय बिल्डटेक प्रा. लि. १२, शांतिनिकेतन बिल्डिं, नाशिक पेठ कॉलनी, ...

दुसऱ्या पक्षकाराचे नांव : —

हस्ते असल्यास त्याचे नांव :- [illegible]

मुद्रांक शुल्क रक्कम : १००

मुद्रांक विक्री अनुक्रमांक व दिनांक : १२/ ६७९८ - १४ /०९

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही :

श्रीकांत मुरलीधर हरदास प.क्र. ८७/१९५/२६,
मेघदुत शॉपिंग सेंटर, सी.बी.एस.

१}**मिळकत वर्णन** :-तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक, पैकी नाशिक महानगर पालिका हद्दीतील, शहर नाशिक येथिल सिडको प्रशासनाने जाहीर केलेल्या भागातील सेक्टर पि-४५-ए नेबरहूड वैशाख मधील प्लॉट नं.२९ ची मिळकत, यांसी एकुण क्षेत्र ४३८२.६२ चौ.मि पैकी उत्तर बाजुकडील २६८२.६२ चौ.मि. क्षेत्राची मिळकत, यांसी चतुःसिमा येणे प्रमाणे

पूर्वेस - नाशिक शिवार नाईक मळा

पश्चिमेस - १५ मिटर रस्ता,

दक्षिणेस - याच मिळकतीमधील १७००.०० चौ.मि. गार्गी आनंद यांना दिलेले क्षेत्र

उत्तरेस - प्लॉट नं.२६,२७,२८ च्या मिळकती,

येणेप्रमाणे जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण, निधी-निक्षेपासह मिळकतीतील जाणे येणे साठी असलेले रस्ते वापरण्याचे हक्कांसह चतुःसिमेतील दरोबस्त बिनशेती प्लॉट मिळकत. या समजुत पत्रात वर वर्णन केलेल्या २६८२.६२ चौ.मि क्षेत्राचे प्लॉट मिळकतीचा उल्लेख "उपरोक्त / सदर प्लॉट मिळकत" असा करण्यात आला आहे. लिहून घेणार यांचा उल्लेख पक्ष नं.१ अथवा तुम्ही, व लिहून देणार यांचा उल्लेख पक्ष नं.२ अथवा आम्ही, असा करणेत आला असून या संज्ञामध्ये पक्ष नं.१ व पक्ष.२ यांचे वंशज, वारसदार, कुंटुबिय, प्रतिनिधी, मुखत्यार यासर्वांचा समावेश आहे.

२.} वर कलम १ यात वर्णन केलेली प्लॉट मिळकतीचे विकसनकामी श्री.काशीनाथ विठोबा नाईक व इतर यांनी पक्ष नंबर १ याच्या लाभात विकसन करारनामा व जनरल मुखत्यारपत्र लिहून व नोंदवून दिलेले आहे. पक्ष नंबर १ यांनी सदर प्लॉट मिळकतीत बांधकाम करण्यासाठीचा नकाशा मे. कार्यकारी अभियंता (नगररचना) नाशिक महानगरपालिका नाशिक यांच्याकडील सॅक्शन ऑफ बिल्डींग परमिट ॲन्ड कमेंन्समेंट सर्टीफिकेट नंबर एलएनडी/बीपी/बीर/५८२/७०४३ दिनांक २२/३/२०१७ अन्वये मंजुर करुन घेतला आहे. पक्ष नंबर १ यांनी जाजू नाईकरा अमर वृंदावन अपार्टमेंट या नावाने सदर प्लॉट मिळकतीत सी,डी, व इ विंग असलेल्या दोन ईमारतीचे बांधकाम करण्याचे ठरविले असून सी व डी विंग पैकी डी विंगमधील खाली नमुद केलेल्या सदनिकांचे

विक्री कामी पक्ष नंबर १ यांनी पक्ष नं.२ यांचेबरोबर व्यवहार केले आहेत.

| सदनिका क्रमांक | विंग | मजला | खरेदी घेणारांचे नांव |
|---|---|---|---|
| डी. ३ | डी. | पहिला | श्री. कमलेश कोल्हे व १ |
| डी ४ | डी. | दुसरा | श्री. प्रणय गुजराथी व १ |
| डी.७ | डी. | दुसरा | श्री. कचरू काकड व १ |
| डी.१२ | डी | तिसरा | श्री. महेश राणे व १ |

३. पक्ष नंबर १ यांनी नाशिक महानगरपालिकेने मंजुर केलेल्या इमारत बांधकाम नकाशानुसार सी व डी विंगचे बांधकामास सुरूवात केली असून इ विंगचे बांधकामास अद्यायप पावेतो सुरूवात केलेली नाही. इ विंग मधील सदनिकांचे विक्रीकामी पक्ष नंबर १ यांनी कोणाबरोबरही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नाही. नाशिक महानगरपालिकेने मंजुर केलेल्या इ विंगचे इमारत बांधकामाचे नकाशात पक्ष नंबर १ यांना बदल करावयाचा असल्याने त्यासाठी पक्ष नंबर १ यांनी इ विंग इमारतीचा नविन बांधकाम नकाशा तयार केला आहे. सदर नकाशा नाशिक महानगरपालिकेकडुन पक्ष नंबर १ यांना मंजुर करून घेणेचा आहे. इमारत बांधकामाचा नकाशा मंजुर करून घेणेपुर्वी पक्ष नंबर १ यांनी इ विंगचा नविन तयार केलेला नकाशा पक्ष नंबर २ यांना दाखवून समजावून सांगीतला आहे. इ विंगचे नविन इमारत बांधकाम नकाशामुळे सी व डी विंगचे बांधकाम नकाशांत, त्यातील सदनिंकाचे क्षेत्रात, सदनिकात पुरविण्यात येणा-या सुविधात कोणताही बदल अथवा परिणाम होणार नाही केवळ गार्डन स्पेसमध्ये किरकोळ बदल होणार असल्याने पक्ष नंबर २ यांनी इ विंगचे नविन इमारत बांधकाम नकाशात व त्यांचे मंजुरीस संमती दिली आहे. इ विंगचे नविन इमारत बांधकाम नकाशा मंजुर करतेवेळी सदर नकाशात नाशिक महानगरपालिकेने काही दुरूस्ती सुचविल्यास सदर दुरूस्ती करून बांधकाम नकाशा मंजुर करून घेणेस पक्ष नंबर २ यांनी संमती दिली आहे.

४. या संमतीपत्रा सोबत पक्ष नंबर १ यांनी तयार केलेला नविन बांधकाम नकाशा जोडला असुन त्यावर पक्ष नंबर २ यांनी संमती देणार म्हणून सही केली आहे.

५. उपरोक्त प्लॉट मिळकतीचे विकसनकामी श्री. काशीनाथ विठोबा नाईक व इतर यांनी पक्ष नंबर १ यांचे लाभात लिहून व नोंदवून दिलेला विकसन करारनामा व जनरलमुखत्यारपत्रात भविष्यात काही सुधारणा /दुरुस्ती करणेची आवश्यकता भासल्यास त्यात सुधारणा /दुरुस्ती करणेस पक्ष नंबर २ यांची संमती असून त्याबाबत पक्ष नंबर २ यांची कोणतीही तक्रार राहणार नाही असे पक्ष नंबर २ यांनी मान्य केले आहे.

येणेप्रमाणे संमती पत्र राजीखुशीने व स्वसंतोषाने समजून उमजून लिहून दिले असे.
तारिख, मजकुर.

**लिहून घेणार पक्ष नंबर.१**

मे. अमर बिल्डटेक प्रा लि., तर्फे संचालक,
श्री.सुजित रामकृष्ण जाजू

**लिहून देणार पक्ष नंबर.२**

१.श्री. कमलेश वसंत कोल्हे सौ. प्रियंका कमलेश कोल्हे

२ श्री. प्रणय अरुण गुजराथी सौ. हेमांगी प्रणय गुजराथी

३ श्री. कचरु महादेव काकड सौ. माधवी कचरु काकड

४ श्री. महेश खुशाल राणे सौ. शोभा खुशाल राणे

साक्षिदार

१. (Rahul S. Tambat)

२. अजय प्र. तोंडर